**श्री.संजू बारकू चौधरी, आरोग्य सेवक पुरुष, प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तगाव, ता.राहाता यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-यांची नेमणुक करणेबाबत.**

जिल्हा परिषद अहमदनगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. कार्या -२/ आस्था-३/०१७२०/२८०/२०२४
अहमदनगर दि २१ /०५/२०२४

**वाचा**:-१.वैदयकीय अधिकारी,प्रा.आ.केंद्र अस्तगाव, ता.राहाता यांचे कडील दोषारोप पत्र जा.क्र.आरोग्य /आस्था/९२१/२०२३ दिनांक १०/१०/२०२३
२.इकडील दोषारोप पत्र जा.क्र.वशि/आस्था-३/२२२/२०२४ दि.१२/०४/२०२४
३.वैदयकी अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तगाव, ता.राहात यांचे पत्र जा.क्र./आस्था/४०५/२०२४ दिनांक ३०/०४/२०२४
४.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (३) (५) नुसार

श्री.संजू बारकू चौधरी, आरोग्य सेवक (पुरुष) हे उपकेंद्र राजुरी, प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तगाव,ता.राहाता जिल्हा अहमदनगर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी अनधिकृत गैरहजर राहून कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन व कर्तव्यात कसूर केल्याने संदर्भ क्र.२ अन्वये श्री.चौधरी यांचे विरुध्द ज्ञापन/दोषारोप बजविण्यात आलेले आहे सदर दोषारोप पत्र श्री.चौधरी यांना दिनांक २२/०४/२०२४ रोजी दिलेले असलेबाबत पोहोच या कार्यालयास प्राप्त आहे. संदर्भ क्र.३ अन्वये वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तगाव ता.राहाता यांचे कार्यालयाकडून या कार्यालयास प्राप्त झाली आहे. तथापी सदर दोषारोप श्री.चौधरी यांनी अमान्य केले आहेत.

इकडील संदर्भ क्रं.२ चे दोषारोप पत्रात खुलासा सादर करणेसाठी दहा दिवसाची मुदत देण्यात आलेली होती. श्री.चौधरी यांनी विहीत मुदतीत खुलासा सादर केलेला आहे. श्री.चौधरी यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६(३) च्या तरतुदीनुसार खुलासा अमान्य केलेने खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी विशेष चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६(५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री. मोहन कडलग कनिष्ठ प्रशासन अधिकारी/सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती राहाता यांची नेमणुक करण्यात येत आहे.सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी परिशिष्ट क्र.३ व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे.

तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. वरीलकामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्याwww.nagarzp.gov. in या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात आलेला असुन त्याचा संकेतांक202405211000086 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

१. प्रतः- विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग,नाशिक सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते

२. श्री. मोहन कडलग कनिष्ठ प्रशासन अधिकारी/सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती राहाता, ता.राहाता जिल्हा परिषद अहमदनगर

व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहाता, ता.राहाता, जिल्हा परिषद अहमदनगर

२./- सदर आदेशाची प्रत श्री. मोहन कडलग---- कनिष्ठ प्रशासन अधिकारी/सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती राहाता यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्रं.१ ते

३.श्री.संजू बारकू चौधरी, आरोग्य सेवक पुरुष

व्दारा :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तगाव, ता.राहाता जिल्हा अहमदनगर

२/- सदर आदेशाची प्रत श्री.पोले, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर